दिनांक :  .५.२०१९

प्रति,

**१. मा. केंद्रीय गृहमंत्री, नवी देहली.**

**२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

**विषय : राष्ट्रप्रेमी आणि प्रखर हिंदुत्वनिष्ठ अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांच्या अटकेचा निषेध; अधिवक्ता पुनाळेकर यांची त्वरित मुक्तता करा !**

मुंबई येथील राष्ट्रप्रेमी, प्रखर हिंदुत्वनिष्ठ आणि हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय सचिव अधिवक्ता संजीव पुनाळेकर आणि माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. विक्रम भावे यांना केंद्रीय अन्वेषण यंत्रणेने (सीबीआयने) दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी २५ मे या दिवशी अटक केली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येचा तपास सध्या केंद्रीय अन्वेषण यंत्रणा करत आहे. या प्रकरणी गेल्या ३ वर्षांत सीबीआयने अनेक निरपराध हिंदूंना संशयित म्हणून अटक केली आहे. आता या प्रकरणी अधिवक्ता पुनाळेकर यांना १० मासांपूर्वी एका संशयित आरोपीने दिलेल्या जबाबावरून अटक करण्यात आल्याचे वृत्तवाहिन्यांनी दिलेल्या वृत्तातून समजत आहे. सीबीआयने केलेली ही कारवाई अत्यंत चुकीची आणि निषेधार्ह आहे. या सर्व प्रकरणात सीबीआयचे वागणे, हे संशयास्पद आणि हिंदुत्ववाद्यांवर दबावतंत्र निर्माण करणारे आहे. हे सर्व हिंदुत्ववादी म्हणवणारे शासन सत्तेत असतांना होत आहे, हे आम्हा सर्व हिंदूंना धक्कादायक आहे.

*** या अनुषंगाने लक्षात आलेल्या गोष्टी पुढे देत आहोत....**

१. शासनाकडून अनुदान किंवा भूखंड घेऊन त्यावर जी रुग्णालये बांधली जातात, त्यांत गरीबांसाठी १० टक्के खाटा सवलतीच्या दरात आणि २० टक्के खाटा विनामूल्य असाव्यात, अशी तरतूद आहे; परंतु अनेकांना त्या सुविधेचा लाभ मिळत नाही. हा भाग लक्षात घेऊन या संदर्भात गरीबांच्या न्याय्य हक्कासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. यावर न्यायालयाने रुग्णालयांना गरिब रुग्णांसाठी खाटा आरक्षित ठेवण्याचा आदेश दिला.

२. दिनांक ११ ऑगस्ट २०१२ या दिवशी मुंबईतील आझाद मैदान येथे रझा अकादमीच्या ५० सहस्रांहून अधिक धर्मांधांनी दंगल केली. त्या वेळी धर्मांधांनी राष्ट्रीय मालमत्तेची हानी केली, पोलीस आणि पत्रकार यांच्यावर आक्रमण केले, तसेच सर्वांत गंभीर म्हणजे महिला पोलिसांवरही अत्याचार केले. या प्रकरणात दंगेखोरांकडून हानीभरपाई वसूल करण्यासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी 'राष्ट्रीय पत्रकार मंच'च्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका विनामूल्य लढवत आहेत. यामध्येही न्यायालयाने संबंधितांकडून हानी भरपाईचा आदेश दिला.

३. एका मागासवर्गीय मुलाचा कारागृहात मृत्यू झाला, त्याच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी त्यांना पूर्णपणे विनामूल्य साहाय्य केले.

४. आदिवासी समाजाच्या, वीटभट्टीवर मजुरी करणाऱ्या एका १६ वर्षांच्या मुलाला रायगड जिल्ह्यातील पोलिसांनी एका खुनाच्या गुन्ह्यात अटक केली आणि त्याचे वय २२ असल्याचे दाखवले. तो मुलगा निर्दोष असल्याची खात्री झाल्यावर अधिवक्ता पुनाळेकर यांनी तो अल्पवयीन असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आणि त्याची सुटका केली.

५. महाराष्ट्र शासनाने सरकारीकरण केलेले श्री साईबाबा संस्थान, शिर्डी; पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, कोल्हापूर; श्री सिद्धीविनायक मंदिर, मुंबई; श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान समिती, पंढरपूर; श्री तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर; यांसह अनेक मंदिरांतील व्यवस्थापन  भ्रष्टाचाराची प्रकरणे अधिवक्ता पुनाळेकर यांनी उघडकीस आणली आहेत.

६. याचसमवेत मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणानंतर 'हिंदु आतंकवाद' या काँग्रेसप्रणीत संकल्पनेचा बुरखा फाडण्याचे काम सर्वप्रथम अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांनी विविध स्तरावर वैचारिक प्रतिवाद करून केले. या प्रकरणातील ५ आरोपींसाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी वकील म्हणून काम पहात काहींना जामीनही मिळवून दिला.

७. वर्ष २००९ मध्ये मडगाव (गोवा) येथे झालेल्या स्फोटाच्या प्रकरणात सनातनच्या ६ साधकांना अटक करण्यात आली होती. त्यांचा खटला अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांनी चालवत त्या सर्वांचे निर्दोषत्व न्यायालयात सिद्ध करत सहाही

जणांची मुक्तता केली.
८. डॉ. दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे, पत्रकार गौरी लंकेश या हत्या प्रकरणांचे अन्वेषण करणारे सीबीआयचे अधिकारी नंदकुमार नायर यांच्या कुकृत्यांच्या संदर्भात केरळ उच्च न्यायालयाने 'हा अधिकारी सीबीआयवर कलंक आहे' अशा शब्दांत ताशेरे ओढले होते, हे अधिवक्ता पुनाळेकर यांनी उघड करत सीबीआय असे कलंकीत अधिकारी हिंदुत्ववाद्यांना कशा प्रकारे गोवत आहेत, हे षड्यंत्र उघड केले.
९. या प्रकरणांत काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना पैशाचे आमीष दाखवून सनातन संस्थेचे नाव घेण्यासाठी उद्युक्त करण्याचे प्रकरण, तसेच एका प्रथितयश इंग्रजी वृत्तवाहिनीने केलेल्या 'स्टिंग ऑपरेशन' यांचे भांडाफोड अधिवक्ता पुनाळेकर यांनी केला. अधिवक्ता पुनाळेकर यांनाही सनातन संस्थेच्या विरोधात भाष्य करण्यासाठी २ कोटी रुपये आमीष दाखवले गेल्याचे त्यांनी सांगितले.
१०. शहरी नक्षलवाद, कर्नाटकमध्ये झालेल्या ८ हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या प्रकरणी 'पॉप्युलर फ्रन्ट ऑफ इंडिया'च्या आबीद पाशावर कारवाई करण्याची मागणी करत अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.
११. अंनिससारख्या पुरोगामी संघटनांनी केलेला भ्रष्टाचार, त्यांनी बेकायदा जमवलेला विदेशी निधी ही प्रकरणे उघडकीस आणण्यासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी साहाय्य केले. परिणामी अंनिससारख्या संस्थांवर धर्मादाय आयुक्तांनी 'कारणे दाखवा' नोटीसही बजावली आहे.
१२. श्री. विक्रम भावे यांनी 'मालेगाव स्फोटामागील अदृश्य हात' हे पुस्तक लिहून मालेगाव स्फोटाचे खरे स्वरूप उघड केले, तसेच अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमधील भ्रष्टाचार माहिती अधिकाराद्वारे उघड केला आहे.

वरील सर्व गोष्टींवरून दिसून येते की, अधिवक्ता पुनाळेकर यांनी अनेक सामाजिक आणि राष्ट्रीय प्रकरणातील भ्रष्टाचार, राष्ट्र अन् धर्म यांवर होणारे आघात आदी रोखण्यासाठी प्रयत्न केले आहेत. आतंकवादी याकूब मेमन, अफजल गुरु, अजमल कसाब अशा देशद्रोह्यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी वकील दिले जातात. असे असतांना संशयित म्हणून अटक केलेल्या हिंदूंची बाजू मांडण्यासाठी अधिवक्ता पुनाळेकर यांनी वकीलपत्र घेतले, यात चुकीचे काय ? एखाद्या वकिलाने निरापराध्याची बाजू मांडण्यासाठी प्रयत्न करत त्यांचा संवैधानिक अधिकारच वापरला आहे. पण तरीही त्यांना षड्यंत्रपूर्वक अटक करून हेतूतः हिंदूंचे दमन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे त्याच्या कर्तव्यावर घाला घालण्यासारखेच आहे. यामुळे सीबीआयने केलेली कारवाई ही संविधानाचा गळा घोटणारी आहे.

**⁕ तरी या प्रकरणी आम्ही मागणी करत आहोत की,**

१. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, तसेच या प्रकरणातील सीबीआयच्या भूमिकेचाही तपास करण्यात यावा.
२. सीबीआयचे अधिकारी नंदकुमार नायर यांच्याकडून डॉ. दाभोलकर प्रकरणाचा तपास काढून तो अन्य निष्पक्ष अधिकाऱ्याकडे सोपवण्यात यावा अथवा तो तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली करण्यात यावा.
३. अधिवक्ता संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची 'मिडीया ट्रायल'द्वारे होत असलेली मानहानी आणि हिंदुत्वनिष्ठांचे दमन थांबवावे.
४. 'सीबीआय'चा कलंकित पूर्वेतिहास पहाता हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांना षड्यंत्रपूर्वक अडकवल्याची उदाहरणे आहेत, याप्रसंगीही अशी शक्यता नाकारता येत नाही. तरी वरील सर्व गोष्टी पहाता निष्पाप असलेले अधिवक्ता संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांना त्वरित सन्मानाने मुक्त करावे.

या मागणीसाठी ...... या दिवशी ..... या ठिकाणी ....... आंदोलन करण्यात आले.

आपला नम्र,

हिंदु जनजागृती समितीकरता,
संपर्क :